**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. २४/२०१५-१६/१७० दिनांकः ९/१२/२०१५

**आदेश**
**आदेश केस क्र. २४ /२०१५-२०१६**

१) श्री. इरगोंडा बाळगोंडा पाटील — अर्जदार
मु. पो. जंगमवाडी ता. हातकणंगले
जिल्हा-कोल्हापूर

विरुध्द

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, कोल्हापूर.

२) कार्यकारी अभियंता, — विरुध्द पक्षकार
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, ग्रा.वि.२ कोल्हापूर.

३) अतिरिक्त कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उपविभाग, हुपरी.

**कोरमः-** १. श्री. एन. बी. बारसिंग, सदस्य सचिव,
२. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

मी श्री. एन.बी. बारसिंग सदस्य सचिव ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहे.

आज दि. २४/११/२०१५ रोजी ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर येथे केस क्र. २४/२०१५-१६ ची सुनावणी झाली. या सुनावणीसाठी तक्रारदार ग्राहक श्री. इरगोंडा बाळगोंडा पाटील, मु. पो. जंगमवाडी ता.

हातकणंगले, जि. कोल्हापूर यांचे तर्फे प्रतिनिधी म्हणून श्री. एच.डी. खापरे उपस्थित होते. वि.प. महावितरणतर्फे उपकार्यकारी अभियंता श्री.ए.बी. पाटणकर, हुपरी हे हजर होते.

**ग्राहकांची मागणी /तक्रारीचे स्वरुप**

दि. ७/१२/२०१५ चा **अ** फॉर्ममधील श्री. इरगोंडा बाळगोंडा पाटील यांचा तक्रार अर्ज या मंचाकडे दि.९/१०/२०१५ रोजी पोस्टाने प्राप्त झाला. यामध्ये त्यांनी जंगमवाडी ता. हातकणंगले येथील गट नं.१०९मध्ये ३ अश्वशक्ती नविन शेती पंपासाठी फेब्रुवारी २०१२ मध्ये अर्ज दिलेला आहे, वितरण कंपनीचे अंदाज पत्रकानुसार हे सर्व्हिस कनेकशन आहे. कृतीमानके विनिमय नुसार त्यास २० दिवसांत मंजूरी मिळणे आवश्यक होते. पण आज तागायत कोटेशन दिले नाही असे म्हटलेले आहे. त्यांनी दि. ४/८/२०१५ रोजी अंतर्गत कक्ष कोल्हापूर येथे तक्रार दाखल केली आहे त्याचे उत्तर अगर आदेश पारित झलेले नाही. सबब कोटेशन त्वरीत मिळावे आणि विलंबा बाबत भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे. दि. ३/८/२०१५ रोजी कार्यकारी अभियंता ग्रामिण विभाग २ कोल्हापूर येथे भरपाईची मागणी कोणाकडे करावी याचा अर्ज केला आहे. या बाबत काय कारवाई झाली हे ग्राहकास अवगत करावे ही पण मागणी केली आहे.

चर्चेदरम्याने वि.प. तर्फे श्री. पाटणकर यांनी श्री. इरगोंडा पाटील यांनी दि.१४/८/२०१३ रोजी अर्ज दिलेला आहे आणि त्यांना कोटेशन पण दिले आहे असे सांगितले. यावर मंचाने त्यांना कोटेशनची तारीख विचारली असता त्यांनी दि. ३०/७/२०१५ ही सांगितली यावर त्यांना तुमची सर्व कागदपत्रे त्वरीत मंचाकडे सादर करण्यास सांगितले त्यांनी त्याप्रमाणे दि. २७/११/२०१५ रोजी कागदपत्रे सादर केली आपल्या पत्रात त्यांनी रु.२६५०/- चे कोटेशन श्री. पाटील यांनी दि. ३०/७/२०१५ रोजी दिले असून ग्राहकाने ही रक्कम दि.३/९/२०१५ रोजी भरल्याचे लेखी दिले आहे. सुनावणी दरम्यान ग्राहक प्रतिनिधीनी दि.३०/७/१५ रोजी चलन दिल्याचे लेखी पत्र मंचास सादर केले आणि चलन कृती मानके कालावधीत न दिल्याबदल ग्राहकास भरपाई मिळावी अशी मागणी केली.

**यावर खालील मुददे उपस्थितीत होतात.**

१. सदर तक्रारारीचे काय करता येईल?

उत्तर :- तक्रार निकाली काढता येईल.

२. आदेश

उत्तर :- अंतिम आदेशाप्रमाणे.

**कारण मिमांसा**

ग्राहकाने कोटेशन मिळावे म्हणून मंचाकडे **अ** फॉर्ममध्ये तक्रार दि. ७/१०/२०१५ रोजी केलेली आहे, याच अर्जात त्यांनी कक्षाकडे दि.४/८/२०१५ रोजी तक्रार केल्याचे म्हंटले आहे आणि ग्राहक प्रतिधिनी कामकाज चालू असताना दि. ३०/७/२०१५ रोजी कोटेशन मिळाल्याचे पत्र दिले आहे. महावितरण तर्फे ही कोटेशन दिल्याचे लेखी तसेच दि ३/९/२०१५ रोजी रु.२६५०/- भरल्याचेही सांगितले आहे, म्हणजेच ही तक्रार आता उरलेली नाही.

सदर अर्ज मंचाकडे आणि कक्षाकडे दाखल होण्यापूर्वी मागणीप्रमाणे कोटेशन मिळाले आहे.ग्राहकाची मूळ मागणी कोटेशन संबंधी आहे. ग्राहकाने मंचाकडे आणि कक्षाकडे अर्ज दाखल करण्यापूर्वी त्यास कोटेशन मिळाले आहे. महावितरणचे अधिका-यांनी तांत्रिकदृष्टया अधिक लोड असल्यामुळे अर्जावर त्वरीत निर्णय होऊ शकला नाही. पण हा वेळ जाणूनबूजून झालेला नाही याची कृपया नोंद घ्यावी अशी विनंती केली आहे.

सबब हा अर्ज निकाली काढतांना विलंब भरपाईच्या मुदया संबंधी कार्यकारी अभियंता विभागय कार्यालय ग्रावि२ कोल्हापूर यांनी ग्राहकाच्या प्रलंबित अर्जावर योग्य ती कार्यवाही करावी असे निर्देश देण्यांत येत आहे.

**आदेश**

१. ग्राहकाचा अर्ज निकाली काढण्यात येत आहे.
२. सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.
३. या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ९/१२/२०१५

(एन. बी.बारसिंग)
सदस्य सचिव

अध्यक्ष पद दिनांक १६-१२-२०१४ पासून रिक्त.

श्री. पी. एस. बुरांडे,
ग्राहक सदस्य,

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.